**ऑनलाईन सेवापुस्तिका भरण्याबाबत कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण**

ठाणे दि २१ ऑगस्ट : जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तिका ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरु असून त्यासाठी आस्थापना विषयक बाबी हाताळणाऱ्या तालुका आणि मुख्यालय स्तरावरील कर्मचाऱ्यांना २० आणि २१ ऑगस्ट २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रीय माहिती केंद्र मानव संपदा केडर मॅनेजमेंट प्रणाली बाबत प्रशिक्षण देण्यात आले.

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान २०१९-२० अंतर्गत सुरु असलेल्या या प्रशिक्षण वर्गाचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत ) अशोक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये विविध विभागाच्या ३२ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

सेवेत रुजू झाल्यापासून सेवा समाप्ती पर्यंत सेवा कालावधीच्या संपूर्ण नोंदी अद्‌यावत करण्यासाठी शासनाने विहित करून दिलेल्या मानवसंपदा प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्‌धतीने यापुढे संपूर्ण नोंदी केल्या जाणार आहेत. या ई-सेवापुस्तीकीचे कामकाज कसे करावे याबाबत पायाभूत प्रशिक्षण प्रशिक्षणार्थींना देण्यात आले. हे प्रशिक्षण सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ सहाय्यक पद्‌माकर राठोड यांनी दिले.

**मानवसंपदा प्रणालीमुळे कर्मचाऱ्यांना होणार फायदे**

ऑनलाइन हस्तांतर, पदोन्नती, बदली नंतर रुजू होणे, कार्यमुक्ती आदेश, सेवा ज्येष्ठता यादी अंतिम करून प्रकाशित करू शकतात. ऑनलाईन लीव्ह व्यवस्थापन कर्मचारी हे प्रामाणिक कर्मचारी कोड / पासवर्डसह पानांचे अर्ज आपल्या रिपोर्टिंग ऑफिसरला सादर करू शकतात आणि रिपोर्टिंग ऑफिसर थेट अर्ज माध्यमातून पत्ते मंजूर किंवा नाकारू शकतात.

लोकमत

# जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना ऑनलाइन सेवापुस्तिकेचे धडे

## दोन दिवसांचे प्रशिक्षण : सेवासमाप्तीपर्यंतच्या अद्ययावत नोंदी

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : सेवा पुस्तिका ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सध्या सुरु झाली आहे. आस्थापना विषयक बाबी हाताळणाऱ्या तालुका आणि मुख्यालय स्तरावरील कर्मचाऱ्यांना मंगळवार व बुधवार या दोन दिवसांच्या कालावधीत ऑनलाइन सेवा पुस्तिका भरण्याचे जेष्ठ अधिकाऱ्यांकडून धडे देण्यात आले.

येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात राष्ट्रीय माहिती केंद्र मानव संपदा केडर मॅनेजमेंट प्रणाली बाबत या कर्मचाऱ्यांना हे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण वर्गाचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सेवेत रूजू झाल्यापासून सेवा समाप्तीपर्यंत सेवा कालावधीच्या संपूर्ण नोंदी अद्यावत करण्यासाठी शासनाने विहित करून दिलेल्या मानवसंपदा प्रणालीमध्ये ऑनलाईन पद्धतीने यापुढे संपूर्ण नोंदी केल्या जाणार असल्यामुळे कर्मचाऱ्यांना हे खास प्रशिक्षण देण्यात आले.

ऑनलाइन हस्तांतर, पदोन्नती, बदली नंतर रुजू होणे, कार्यमुक्ती आदेश, सेवा ज्येष्ठता यादी अंतिम करुन प्रकाशित करु शकतात. ऑनलाईन लीव्ह व्यवस्थापन कर्मचारी हे प्रामाणिक कर्मचारी कोड, पासवर्डसह पानांचे अर्ज, आपल्या रिपोर्टिंग ऑफिसरला सादर करु शकतात आणि रिपोर्टिंग ऑफिसर थेट अर्ज माध्यमातून पत्ते मंजूर किंवा नाकारु शकतात, आदी फायदे या ऑनलाइनच्या मानवसंपदा प्रणालीव्दारे कर्मचाऱ्यांना होणार आहे.

### ३२ कर्मचाऱ्यांचा सहभाग

- ई-सेवापुस्तीकेचे कामकाज कसे करावे, याबाबत पायाभूत प्रशिक्षण प्रशिक्षणार्थींना देण्यात आले. हे प्रशिक्षण सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ सहाय्यक पद्‌माकर राठोड यांनी दिले. प्रशिक्षणात विविध विभागाच्या ३२ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

Hello Thane
Page No. 3 Aug 23, 2019
Powered by: erelego.com